

# लहान गावाची महान गोष्ट

शुभु पटवा



"अरे हरखू, केव्हा आलास शहरातून ?"
"हा एवढ्यातच काका, नमस्कार !"
"सुखी राहा, तुझं कल्याण होवो.
शहराकडे कसं काय, बरं आहे ना हरखू ?"




"आता बरंच म्हणायचं. कुठं शहरातली ती घाईगर्दी, धावपळ अन् कुठं आपल्यासारख्या खेड्यांमधला हा शांतपणा. दोन्हीत खूपच फरक आहे काका. आता पोटच भरायचं म्हटलं तर परिस्थिती नेईल तिथे मात्र जायला हवं. बरं काका, घरात अन् गावात सगळेजण मजेत आहेत का नाहीत ?"

"बरे आहेत म्हणायचे. आला दिवस पुढे ढकलत आहेत. यंदा पुन्हा दुष्काळ पडलाय हरखू. आसपासची गावंही त्यात सापडली आहेत. काय करावं, समजत नाही. कुठं बरं जावं लोकांनी ? कालच रामभाऊ आले होते. विचारीत होते, हरखूची काय बातमी ? आणि आज तूच समक्ष आलास."

"रामभाऊ कसे आहेत काका ? जोरात आहेत का ?"

"नाही रे हरखू. जोरात तर आता कुणीच राहिले नाही ह्या गावात. गेली चार वर्षं सतत दुष्काळ आहे. जनावरं अकाली मरत आहेत. गावात कांहीच कामधंदा राहिला नाही. लोक अगदी हातावर हात ठेवून रिकामे बसले आहेत. तुला तर समजून घेता येईल, शिकला सवरलेला आहेस तू. मी तुला बी.ए. पर्यंत शिकवलं आहे. पण गावातले सगळेजण तुझ्यासारखे नाहीत ना, बेटा. आतापर्यंत गावाला एकच आसरा होता अन् तो म्हणजे दुधाचा. शहरातून गाडी यायची, दूध गोळा करून घेऊन जायची. लोकांना पोटपाण्याची तेवढी एकच सोय होती. पण आता ती तरी कुठे उरली आहे ? घरोघरी गायी मरून पडल्या आहेत. ज्या अजून जिवंत आहेत त्यांनाही पोटभर चारा नाहीच. दूध आटून गेलंय सगळ्या गाईंचं. रानात गवताचं पातं नजरेला दिसत नाही. कोणे एके काळी मात्र गोठ्यात चाऱ्याच्या राशी येऊन पडत असत. पाण्याचा तलाव कधीच कोरडा ठणठणीत पडायचा नाही. पाऊस कसाही असला तरी पाण्याचा तोटा मात्र होत नसे. आता तसं



शहरातून गाडी येई आणि दूध घेऊन जाई.

बघायला ह्यावर्षी एक पाऊस पडला. बरं का हरखू, पण तलावात पाणी काही आलं नाही, कसं येणार ? ते थोपवायला उतारावर काहीच राहिलं नाही. तुला तर ठाऊकच आहे हरखू, मुरूम खणूनखणून ट्रकमध्ये भरून शहरात विकायला जातो. सगळा मुरूम संपत चालला आहे. एक कंत्राटदार येतो शहरातून, तोच खणायला लावतो मुरूम. लोकांना थोडी मजुरी मिळते खरी. पण त्यानं काय होतं ? आता तूच सांग. पाणी वाहात यायला काहीच उरलं नाही तर पाणी येणार आणि साठणार तरी कसं ? पूर्वी जराही पाऊस पडला की पाणी वाहात तलावात यायचं. आता सगळंच बिघडलंय. रान सुनं झालंय्. दुष्काळाला तोंड देताना झाडी तोडली गेली. शेतातील कडबा कापला. लाकूड विकून पोट भरलं. आता तर त्याचाही तुटवडा पडलाय्."

काका आता निवांत बसले, हरखूचा चेहेरा न्याहाळीत. पहिल्यांदाच जाणवलं की हरखू अगदी कसनुसा झाला आहे. थकलेला दिसतो, मरगळलेला दिसतो. डोळे खोल गेले आहेत. कातडी सुरकुतायला लागली आहे. आतापासूनच ही दशा ? दोन वर्षांपूर्वी शहराला गेला तेव्हा काय मस्त जवान होता हा पठ्ठा ! आता अगदी काडी पैलवान दिसायला लागला आहे. असं कशानं झालं ?

काकांच्या काळजात तुटायला लागलं. पोराची दशा पाहून त्यांना खूप खंत वाटली. बाजेवरून उठताना ती वाजली. काकांची थकलेली हाडंही कडकड वाजली. दोन्हींचा आवाज सारखाच होता जणू. म्हातारी बाज, म्हातारे काका.

"कसा झाला आहे रे, तू हरखू ? अगदी मरगळल्यासारखा !" त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत काका म्हणाले.

शेवटी बापाचं काळीज ना? कमावता मुलगा आहे हरखू, म्हातारपणाची काठी.

दोघे अगदी एकमेकांच्या जवळ होते. काकांच्या चेहेऱ्यावरच्या सुरकुत्या आणखी वाढल्या. ते खोकू लागले आणि मट्कन् खाली बसले.

"आता म्हातारपण आलं, पोरा."

"ते तर आहेच काका, पण काळजी घ्या नीट." हरखू म्हणाला.

"माझं असू दे रे. आता आणखी काय व्हायचं आहे माझं. पण तू कसा झाला आहेस पोरा? गेलास तेव्हा असा नव्हतास. शहरात तर सगळ्या सुखसोई असतात म्हणे, तरी तुझी ही अशी दशा कशानं झाली रे?"



**"काय दशा झाली रे तुझी ही हरखू! अगदी मरतुकडा झाला आहेस!"**
**डोक्यावरून हात फिरवीत काका म्हणाले.**

काकांचा कंठ दाटून आला. हरखूही चटदिशी खाली बसला, काकांजवळ. त्याने हळूच त्यांच्या पायावर हात ठेवला.

हरखू म्हणाला-

"अहो काका, असं नाही मनाला लावून घ्यायचं. हा तर काळाचा महिमा, त्याचा फटका मलाही बसला आहे. मी अगदी मजेत आहे काका, तुमच्यापेक्षा तगडा. पण तुम्ही स्वत:कडेही थोडं बघा, आजारी वाटता. तापाबिपातून उठलात की काय?"


हो रे, बेटा, हरखू. तापच आला होता. डाक्तरांचं इंग्रजी औषध घेतलं सात दिवसांचं. म्हणत होता, भरपूर दूध प्या, नाहीतर उलटा परिणाम होईल. आता आणायचं कुठनं दूध? इंग्रजी औषध आधीच महाग. याच्या पूर्वी तापाबिपावर असं औषध कुठं असायचं? आजी आपली काढा करून रात्रीचा पाजून टाकायची. पुन्हा सकाळी उठल्यावर दात-तोंड धुतल्यावर अनशा पोटी तुळशीच्या पानांचा रस प्यायला लावायची. तीन दिवसात ताप बेपत्ता व्हायचा. आता तर ते मात्रा अन् काढे म्हणजे कटकट वाटते जणू."

काकांची दशा बघून हरखूच्या मनात कालवाकालव झाली. तो फक्त ते काय बोलता ते ऐकत राहिला. स्वत: काहीच बोलला नाही.

काका पुन्हा शहराचा विषय काढतात की काय अशी भीती होती हरखूला. आपली मरतुकडी परिस्थिती त्याला काकांपाशी सांगायची नव्हती. काकांना खूप दु:ख होईल ते ऐकून.

आहेच काय शहरासंबंधी सांगायला? धुराने गुदमरवून टाकणारे रस्ते, अफाट गर्दी, इकडून तिकडे धावत चालणारी धावपळ, शिट्ट्यांचे आवाज, घरांमधून, गल्यांमधून नाकात शिरणारी घाण, ओलीने चिंब झालेल्या भिंती, पिण्यासाठी घाणेरडं पाणी. हरखूसुद्धा अशाच जागी,

अशाच परिस्थितीत राहातो नाही? ह्यातलं काहीच सांगायचं नाही. काकांना केवढी खंत वाटेल? खूप दुखावतील ते. नाही, नाही. अगदी काहीसुद्धा सांगायचं नाही, वाट्टेल ते झालं तरी.




"शहराबद्दल सांगण्यासारखं आहे तरी काय डोंबल! नुसते धुराने भरलेले रस्ते!"

मनातल्या मनात विचार चालले होते हरखूचे. हळूच त्याने काकांच्या पायावरचा हात काढून घेतला आणि मांडी घालून बसला.


काकांच्या मनातला आनंद भरून आला होता. खूपच खुशीने ते हरखूला न्याहाळू लागले. बापाच्या मनात पोराविषयी लाड, कौतुक उचंबळून आलं.

"रामभाऊ का बरं विचारीत होते, काका ?" विषय बदलण्यासाठी हरखू म्हणाला.



काका आता सावरले होते. "सांगेन, बेटा सांगेन, आधी उठ. आंघोळबिंघोळ करून घे. केव्हाचा आल्यापासून तसाच बसला आहेस ! एवढ्या लांबून आला आहेस, दमला असशील."

हरखू गावी येऊन आज पाच दिवस झाले आहेत. चावडीवरल्या गप्पा अजिबात ऐकायला मिळाल्या नाहीत ह्या पाचही दिवसांमध्ये. अगदी स्मशानासारखं होऊन बसलं आहे गाव. वाडवडिलाकडून दुष्काळाच्या गोष्टी ऐकायला मिळायच्या पूर्वी, पण आता हा दुष्काळ वर्षानुवर्षे असाच पडत राहणार आहे का ? ह्याचा उपाय तरी काय ?



आख्ख्या पाच दिवसात पारावर जाग, गजबज काही दिसली नाही.

हरखूला ते एक आव्हान वाटलं. उपाय नक्कीच असणार पण चूक आपलीच आहे. जाणून घ्यायची आपली कुवत खूप कमी पडते. ही पृथ्वी तर सगळ्यांची आहे. ती सगळ्यांना पोटभर देऊ शकेल. मग कशामुळे माणसं उपाशी मरतात? जनावरांना का बरं अकालीच मृत्युमुखी पडावं लागतं? हरखूच्या मनात प्रश्नामांगून प्रश्न उभे राहू लागले. उत्तरंही हवी होती त्याला.

भारत देश तर गावांचा, खेड्यांचा देश आहे ना? गावांमधून राहाते इथली जनता. सारं बिनचूक कळतं त्यांना. मग चूक आहे तरी कशात! काय चुकतं नेमकं? कुणाला तरी हे शोधता येईल का? एक सोपा मार्ग कोण दाखवेल?

बेचैन झालेल्या हरखूच्या मनात असलेच काहीकाही विचार येत राहिले. गाव सोडून त्याला अजून जेमतेम दोनच वर्ष झाली आहेत. पूर्णपणे शहरी असा तो अजूनही झाला नाही.

त्याला राहूनराहून बालपणचा काळ आठवायला लागला. तेव्हा गायरानं असायची. तेथे गायी चरायच्या. गायरानांची निगा राखली जायची. सामूहिक पद्धतीचं काम असायचं ते. तेव्हा आयुष्य एवढ्या संकटांमध्ये सापडलेलं नसायचं.

हरखूला गंगू तेल्याची घाणी आठवली. धष्टपुष्ट असा त्याचा बैल. दिवसभर तो बैल घाण्याभोवती फिरायचा. गळ्यातली घंटा वाजत राहायची. गंगूला गावात सगळेजण मामा म्हणायचे. तो सगळ्यांचा मामा केव्हा आणि कधीपासून झाला ते हरखूलाही माहीत नाही. हरखूही त्याला मामाच म्हणायचा. सगळ्यांचा मामा, अख्ख्या गावभराचा गंगूमामा.

परस्परांमध्ये मिळणं-मिसळणं, एकमेकांच्या मनांशी एकरूप होणं. खरंच, गाव काही और होतं हरखूचं.

आता घाणी राहिली नाही. गंगू मामाच्या म्हाताऱ्या बैलाचं त्याला ओझं वाटायला लागलं आहे आता.

गावात फिरत असताना त्यादिवशी गंगूची भेट झाली. साठी उलटली आहे त्याची. दिवस कसेबसे ढकलले जाताहेत आपले. कसे जातात ते कळतसुद्धा नाही.

गंगू काठी घेऊन चालतो हल्ली. दोघेही समोरा-समोर आले.

"नमस्कार, गंगूमामा." गंगू मामाच्या पायांपाशी हात नेत हरखू खाली वाकला.

डोळ्यांवर चष्मा होता. गंगूला नीटसं दिसत नव्हतं. त्याने डोळ्यांवर हात धरला. मान उंचावीत बघून तो ओळखायचा प्रयत्न करू लागला.



डोळयांवरील चष्म्याने गंगूला नीट दिसत नव्हते. त्याने डोळयांवर हात धरला, आणि मान ऊंचावून ओळखण्याचा प्रयत्न केला.

"मामा, मी हरखू. ओळखलं की नाही ?"

"ओळखलं रे, हरखू. खूप दिवसांनंतर पाहिलं ना ? शहरात जाऊन आता तुझ्यातही बदल झाला आहे आणि माझीही दृष्टीसुद्धा पूर्वीसारखी राहिलेली नाही."

"कुठं जाऊन आलात मामा ?" हरखूने विचारलं.

गंगूने हरखूचा हात धरला. तो त्याचा चेहेरा निरखून पाहू लागला.

"आता कुठं जाणार बेटा ! दिवस मोजतोय् बापडा. गावात कांहीच काम उरलं नाही. बैलाला दोन्ही वेळची वैरणही घालू शकत नाही. आता घराघरात शहरातलं तेल असतं. ताजं, निर्भेळ तेल आता कुणालाच चालत नाही."

"खरंय मामा", हरखू म्हणाला आणि विचार करू लागला.

ताजं तेल, ताजं हवापाणी, ताजं दूध हे सगळं कसं आता ऐकलेल्या गोष्टीतल्यासारखं वाटतं. शहरात तर हे काहीच नाही कुणाच्या वाट्याला, पण आता खेड्यांमध्येही या सगळ्यांची उणीव जाणवायला लागली आहे.

कसं झालं हे असं ? हरखूच्या मनात विचारांचं काहूर माजलं.

कशी भरावीत सगळ्यांची पोटं ? खाणाऱ्यांची संख्या वाढली आहे, म्हणूनच सगळ्याची कमतरता निर्माण झाली की काय ? पण असं तर नको व्हायला.

हरखूला वाटलं, आपण शिकलेसवरलेले आहोत, मग त्या सगळ्यांमागची कारणं आपण शोधायला नकोत का ? सगळे जण का नाही या गोष्टींचा विचार करीत ? यावर काही उपाय नको का काढायला ?

काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात वाचलेली बातमी आठवली. भरपूर शिकलेल्या विद्वान माणसानं पुरेपूर अभ्यास, तपासणी करून सांगितलेली गोष्ट होती ती. मग त्यावर कसा कुणाचा विश्वास बसणार नाही ?

दुप्पट लोकसंख्या असती तरी आपली पृथ्वी त्यांच्या पोटापाण्याची सोय करू शकते - अशी बातमी होती ती. सगळं नीट नीट समजून घ्यायला हवं. पण नीटनीट सांगणार तरी कोण ? त्या माणसाने केलेला अभ्यास, तपासणी कशाबद्दलची आहे ? गावातल्या लोकांपर्यंत तरी पोहोचू द्या ना हे सगळं ?


हरखूच्या लक्षात आलं की अरे, हे तर आपलंच काम आहे. शिकल्या सवरलेल्यांचं काम. पण आपण तर नोकरीसाठी शहरात जाऊन बसलो आहोत.

हरखूच्या मनात चलबिचल होऊ लागली. काय करावं बरं ? गावातल्या परिस्थितीने त्याला हलवून सोडलं.

त्याला काहीच उमजेनासं झालं. मनातल्या उलटसुलट विचारांना त्याला आवर घालता येईना. पाठोपाठ कितीतरी गोष्टी आठवत राहिल्या.

त्याला पावसाच्या पाण्याची गोष्ट आठवली. पुस्तकांमधून त्यानं हे वाचलं होतं. जेवढा पाऊस पडतो त्याच्यामुळे खरं तर सगळ्या पृथ्वीवर पाणीच पाणी व्हायला हवं.

रेताड वाळवंटांमध्येही पाऊस पडतो. कमी पडत असला तरी तो पडतो एवढं नक्की. पण हे सारं पाणी साठून राहू शकत नाही. पडणाऱ्या पावसाचं पाणी अडवण्याच्या काही पद्धती खेड्यांमध्ये प्रचलित आहेत. पण दिवसेंदिवस आता लोकांना त्यांचा विसर पडायला लागला आहे. नळाच्या पाण्यानेसुद्धा आता नीट समजून पारखून घेतलेली गोष्ट विसरायला लावली आहे. नळातून कधीतरी पाणी, कधीतरी नुसतीच शिट्टी ऐकू येते.



लोकांना पूर्ण विसर पडला आहे. नळाच्या पाण्याने त्यांना नीट समजून –
पारखून घेतलेली गोष्ट विसरायला लावली.

आपण जोवर स्वतःवर विसंबून होतो तोवर पाणी पुरायचं. तांब्याभर पाण्यात हाततोंड धुवून थोडंफार पाणी शिल्लकही ठेवायचो आपण. कळशीभर पाण्यात तर सगळ्या कुटुंबाची आंघोळ व्हायची. आंघोळीचं पाणीही तेव्हा आपण वाया जाऊ देत नव्हतो. ते सुद्धा साठवून सारवायला, झाडांसाठी, घर पुसायला वापरलं जायचं. कितीप्रकारची कामं एकदाच साठवलेल्या पाण्यातून तेव्हा केली जात असत. आता तर नळही तसाच सोडून पाणी खुशाल वाहू देतात लोक. उगाच्या उगाच कितीतरी वाया जाणाऱ्या पाण्याची चिंता कुणालाच कशी नाही ?

पाणी हेच जीवन. पाण्याविना सगळंच शून्य. मग बदलत्या पाण्याबरोबर त्याची महतीही कशी बदलली ? ह्याचा दोष कुणावर आहे ?

हरखूच्या मनात प्रश्न उभा राहिला. पण त्याच्यापाशी त्याचं उत्तर मात्र नाही. शोधावी लागतील उत्तरं या आणि अशाच काही प्रश्नांची. सोडवायला हवीत ही कोडी. हे पाणी, ही भूमी, ही जंगलं म्हणजे आपल्या पूर्वजांकडून आपल्याकडे आलेला ठेवा आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष कसं होतं आपलं ? ही नातीगोती कशामुळे बदलली ?

हरखूला काही केल्या उलगडा होत नाही. माती, पाणी, जंगल, झाडं, गवत, पशुपक्षी, सगळ्यांमध्ये पूर्वी काही तरी एकसूत्रता होती. परस्परांच्या गरजा सारे भागवू शकत अशी एकवाक्यता होती. एखाद्याला कसलीशी उणीव असली की बाकीचे सारे मिळून ती भरून काढीत. मग हे सारं विस्कळीत तरी कशामुळे झालं ?

हरखूला पुन्हा वर्तमान पत्रातली ती बातमी आठवली. रेताड वाळवंटी प्रदेशात पाऊस फारच कमी होतो. शेतीही फारच थोडी होते. पण तेथे पशुधन मात्र जास्त प्रमाणात आहे. त्यातूनही गोधन जास्त. शेळ्यामेंढ्या जास्त. हे कसं काय ?

हा ताळमेळ काही वेगळ्याच प्रकारचा म्हणायचा. शेती नाही, पाऊस नाही, पण पशुधन विपुल. काय चरून जिवंत राहातं पशुधन ?

हा काही जादूचा खेळ किंवा मायावी प्रकार नव्हे. एक जगावेगळा ताळमेळ आहे. ह्याचा तोल ढळला की संकटंच संकटं.

पशुधन आहे आणि त्यासाठी वैरणही आहे. कमी पाणी लागणारी ही हिरवळ.

तिची सुकत जाणारी पाती थोड्याशाही पावसाने पुन्हा तरारणार, हिरवीगार होणार. नवीन अंकुर फुटणार. सूर्याची धगधगती आग वाटणारं



त्याला ती साहसपूर्ण घटना आठवते.
झाडांची तोड थांबवताना शेकडो लोक मारले गेले.



ऊनही हे गवत सहज पचवतं. पशू, गायींना आधार देणाऱ्या आहेत ह्या गवताच्या जाती.

सगळं पशुधन ह्याच्या आधारानेच तर जिवंत राहातं.

पण आता मात्र लुटलं गेलंय सारंच गवत, लुबाडली गेली आहेत सारीच रानं. ज्या जमितीतून फक्त गवतच मिळवायचं तिथं शेती कशी करणार ? लोभापोटी जिकडेतिकडे हेच सारं घडू लागलं. जिथे शिंपायला पाणी तिथेतिथे हेच चित्र. मग होणार काय. ह्या भूमीवर जास्त पाणीच पडायला नको. रेताड वाळवंटी प्रदेश जास्त पाणी धरू शकत नाही. मग शेती तरी का करावी ? फक्त हिरवळच का ठेवू नये ? लोभापोटी जमिनीची नासाडी का म्हणून ? एवढ्याशा, तात्पुरत्या फायद्यासाठी पिढ्यान् पिढ्या संकटात लोटल्या त्या का म्हणून ? नांगराचा उपयोग होत असताना यंत्राने नांगरणी कशासाठी ?

कितीतरी प्रश्नांची वादळं हरखूच्या मनात घोंघावू लागली. त्याला वाटलं आपल्या मस्तकाच्या ठिकऱ्या उडतील आता. तो अगदी एकटा आणि समोर एवढे सगळे प्रश्न. कसे सुटतील...

हरखूच्या लगेच लक्षात आलं की हा तर आपला पराभव होतो आहे. कबूल करून टाकावा आपला पराभव.

मग चैतन्याने भारलेला तो प्रसंग त्याला आठवला. वृक्षतोडीला विरोध करण्यासाठी गेलेली शेकडो माणसं झाडांसारखीच कापली गेली. शेकडो वर्षांपूर्वीची एक हकीकत हरखूच्या डोळ्यांपुढे नाचू लागली. बाभळीची झाडं वाचवायला एक-एक करून तीनशे त्रेसष्ठ माणसं कापून काढली गेलीत.

आपणा सगळ्यांमधलं ते बळ आता कुठं गेलं ? आपल्या मनाचं ते सामर्थ्य आता कुठं गेलं ?

झाडं फक्त देत असतात. घेत काहीच नाही. आपण मात्र झाडांकडून सतत घेत राहतो. त्यांना लुबाडीत राहतो. त्यांना कापूनही काढतो आपण. मग मिळणार काय त्यापासून. फक्त लाकूडच मिळणार ना? आणखी काहीच नाही.

पण झाडांच्याच भरवशावर ज्यांची गुजराण चालते, पोटं भरली जातात. का वागतात असं? कोणत्या काळात घडलं नाही असंते? नेहमीच तर घडत आलंय, पण आताच्या आणि पूर्वीच्या काळात फार मोठी तफावत आहे. आज मात्र आपल्याला हे सगळं समजून घ्यायला हवं. जगायचं असेल, तर हे सगळं जाणूनही घ्यायला हवं.

पण कोण सांगणार हे सगळं? खरं तर आपण सारेच जाणतो आहोत. पूर्वी झाडावर कुऱ्हाड चालवली जाई ती अशी एकदम नाही. कोणत्या झाडाचं आयुष्य आता किती राहिलं आहे त्याचा अंदाज, अदमास घेतला जायचा. ताज्या, नव्या झाडापासूनही काही ना काही पदरात पाडून घेतलं जात असे, पण ते कायमस्वरूपी असे. असं नवं झाड माणसाच्या हाती बळी पडत नसे.

असं नातं असायचं रानाशी. ह्यात बदल घडवला कुणी? पुन्हा प्रश्न उभा राहिला.

हरखू वैतागला ह्या प्रश्नांमुळे.

घरी पोहोचला तेव्हा सूर्य मावळतीला आला होता. बुडत्या सूर्याचा लाल रंग दोन वर्षांनंतर नीट बघत होता तो. शहरांमध्ये सूर्याचा उदय असा बघायला वेळ असतोच कुणापाशी?

शहरांमधल्या आकाशाला भिडणाऱ्या इमारती. डोक्यावर आलेला सूर्यच फक्त दिसतो त्यामुळे. लाल रंगाचा सूर्य दिसतोय कुणाला?

शहरात उजाडण्यापूर्वी भोंग्याच्या आदेशावर तिथे दिवस सुरू होतो. कामं सुरू होतात, धावपळ सुरू होते. तिथे सूर्याच्या किरणांमध्ये असलेल्या सात रंगावर कुणी तरी विचार करीत असेल का? भाकरी आणि रोजगारासाठीच्या दगदगीत तिथे कुणाच्या तरी चेहेऱ्यावर लाली शिल्लक राहाते काय?

ह्या बसमधून त्या बसमध्ये स्वतःला आणि एकमेकांना ढकलायची घाईगर्दी. धुराड्यांमधून निघणाऱ्या धुरामुळे काळी होणारी फुफ्फुसं. सगळ्यांना काही तरी देऊन सगळ्यांचं सगळं काही जिथे काढून घेतलं जातं, तिथे लालीची गोष्ट सांगावी तरी कशी.

अंगणात आईजवळ बसलाय हरखू. मोकळ्या आकाशाखाली भाकर जेवण्याचं. हे सुख. आईच्या मायेचं हे वरण, ही भाजी. पंख्याने वारा घालणाऱ्या आईचे हे थकलेले, म्हातारे हात.

आईने हळू आवाजात हाक मारली,

"बेटा, हरखू"

"ओ गं आई!"



अंगणात हरखू आपल्या आईच्या जवळ बसला. ओहो!

खुल्या आकाशाखाली भाकर तुकडा खाण्याचे सुख!

"माझ्याच्यानं होत नाही अलीकडे. आता सून आणायला हवी घरात. मलासुद्धा सुख हवंसं वाटतं, बेटा. शहराला घेऊन गेलास तर तुला भाकरी करून वाढणारीचं सुख मिळेल. तू शिकलासवरला आहेस पोरा, म्हणून तुला विचारते आहे."

हरखू गप्पच आहे. गावात तो उद्यापर्यंतच आहे. मग पुन्हा आपलं शहर. उद्या निघायचंच आहे.

हात धुवून हरखू उठून उभा राहिला. आईनं पुन्हा हटकलं-

"काही बोलला नाहीस पोरा - सून आणायला हवी ना !"

हरखूने अजूनही तोंड उघडलं नाही. चांदण्या रात्री आईचा थकलेला चेहेरा त्याला नीट दिसून येत होता. तरीही तो गप्पच होता.

त्यानं पावलं उचलली. आईनं ह्यावेळी त्याला काहीच म्हटलं नाही. तो अंगणातून बाहेर आला.

रामभाऊ बाहेर बसले होते. काका आणि रामभाऊंच्या गप्पा चालल्या होत्या. समोरासमोर दोन बाजांवर दोघेही बसले होते.

हरखू निघणार होता. काकांनी हाकारलं म्हणून थांबला. जवळ जाऊन उभा राहिला.

"बैस रे, हरखू" रामभाऊ म्हणाले.

"हो, हो, बोला !" हरखू तिथं बसत म्हणाला.

थोड्या वेळेसाठी तिघेही अबोल झाले. आता काय बोलावं असाच जणू काय त्यांना विचार पडला. शेवटी रामभाऊंनीच शांततेचा भंग केला, "हरखू, उद्या जाणार ना शहराला ?"

हो, भाऊ, उद्याच समजा. उद्या दिवसभर असलो तरी परवा पहाटेच निघणार आहे ना"

उदास झालेला हरखू उत्तरला.

"मग काळूला तुझ्या सोबत घेऊन जा. इथं गावात नुसता रिकामटेकडा बसून भाकऱ्या मोडतोय.

शेतीमध्ये काहीच नाही. घेऊन जाशील तर आधार होईल घराला. कामाला लागेल पोरगा."

हरखू गप्पच. काय बोलणार? कुठं घेऊन जाणार? रामभाऊंना, काकांना वाटलं की शहरात सगळेच खूप सुखात आहेत. शहरात गेल्यागेल्याच कामं हातात पडतात जणू.

"काय करणार त्याला शहरात पाठवून भाऊ?" हरखू म्हणाला.

"इथंच काहीतरी बघा कामाचं. शहरात आता नको." बोलणं टाळल्यागत हरखू उठला.

रामभाऊच्या काळूला नोकरी पाहिजे. आईला सून पाहिजे. काकांची प्रकृती बरी नाही. त्यांना हरखू आपल्याजवळच असलेला पाहिजे आहे.

हरखूला सुद्धा काही तरी पाहिजे आहे. गावाची दशा बघून खूप अस्वस्थ झाला आहे तो. शहरात देखील बस्तान बसवता आलं नाही त्याला.

पण हरखूनं हे सगळं सांगायचं तरी कुणाला?

सगळीकडे सारखेच प्रश्न आहेत. सारखीच परिस्थिती. कुठंच काही मार्ग नाही.

हरखूचा गावातला आठवडा मार्ग शोधण्यातच संपून गेला.

पुन्हा शहरातल्या धावपळीत येऊन मिसळला हरखू.

शहरातली अनोळखी, परकी वाटणारी गर्दी. त्यातच रमेश नावाचा त्याचा एक मित्रही आहे.

रमेशकडे दोनदा जाऊन आला.

दोन्हीवेळा खोलीला कुलूप दिसलं. हरखू बेचैन झाला. मनात सलणाऱ्या गोष्टी कुणाला बरं सांगायच्या? राहावलं नाही म्हणून तिसऱ्यांदा पुन्हा गेला रमेशकडे.

ह्यावेळी खोलीचं दार उघडं होतं. रमेशची दाराकडे पाठ होती. तो शोधीत होता कांहीतरी. हरखू दारातच थांबला. गप्पच. रमेश कॅमेरा शोधीत होता. फोटो घ्यायचा कॅमेरा. त्याने दाराकडे पाहिल्याबरोबर हरखू दिसला.



त्याने टेबलावर ठेवलेली पुस्तकं एका बाजूला सारली. तो टेबलावर थोडासा खाली वाकला. दोघांमधील अंतर कमी झालं.

रमेशच्या चेहेऱ्यावर आनंद पसरला.

"आलास गावाहून ?" रमेशनं विचारलं.

"हो. आलो." हरखूच्या आवाजात निराशा उमटलेली होती.

"काय झालं ?" त्याच्या खांद्यावर हात ठेवीत रमेशने विचारलं.

"असा बेचैन का बरं दिसतो आहेस, बाबा ? गावाहून परतल्यावर कसा तजेला दिसायला पाहिजे चेहेऱ्यावर."

हरखू अजूनही सावरलेला नव्हता. तो काहीच बोलला नाही. खुर्चीवर शांतपणे बसून राहिला.

रमेश चकितच झाला. तोही समोर येऊन बसला. टेबलावरची पुस्तकं थोडीशी बाजूला सारून तो टेबलावर वाकला. दोघांमधलं अंतर थोडंसं कमी झालं.

"घरात सगळे खुशाल आहेत ना, हरखू ! तू एवढा सुस्त कशामुळे झाला आहेस ?"

त्याने हरखूच्या नजरेला नजर भिडवली.

"हो, ठीक आहे सगळं." हरखूनं उत्तर दिलं. पण त्याचा आवाज जडावला होता. घसा बसल्यासारखा जड.

"आल्याआल्याच तब्येत बिघडली म्हणायची तुझी ?" रमेशनं पुन्हा विचारलं.

आता तो पुष्कळच सावरला होता.

“तू कुठं गेला होतास, रमेश ? मी तिसऱ्यांदा येतोय आता, तेव्हा कुठं भेट झाली. गावाहून परतलो तेव्हापासून मन कसंनुसं झालं आहे.”

“आठवण येते का गावाकड़ची ?” रमेशने विचारलं.

“हो, ते झालंच. पण बेचैनी त्याच्यामुळे नाही. मी गावाची जी काही दुर्दशा बघून आलोय त्यामुळे खूप बेचैन झालो आहे. काय होणार रे, रमेश ? गावात सध्या काहीच नाही. तू तजेल्याची गोष्ट करतोस ? अरे, तजेला आहे कुठं तिथं ? फक्त सुन्नपणा भरून राहिला आहे. सतत फुटणारा हुंदका फक्त. पण तो ऐकणारा कुणीही नाही.”

“का ? तू आहेस की ?” रमेश म्हणाला.

“मी कुठं आहे ? मी तर इथं असतो, शहरात.”

हरखूचा असहाय्यपणा उघडउघड लक्षात येत होता.

“शहरात तरी दुसरं काय आहे, हरखू ? इथले हुंदके ऐकायला येत नाहीत का तुला ? शहरात राहाण्यासारखं आता काय शिल्लक उरलंय. इथं जे काही आयुष्य आपण जगतो आहोत, त्याला काय आयुष्य म्हणायचं ?”

समोरासमोर नेमके प्रश्न.

प्रश्नांची उत्तरं शोधणारे रमेश आणि हरखू.

सगळ्यांनाच हरवून टाकणारा काळोख सर्वत्र. मग ह्या दोघांचंच काय विशेष.

कुणीतरी सांगून ठेवलंय ना निसर्गाचा कोप होते, तेव्हा कुणीही त्यातून सुटत नाही. पुरती अद्दल घडते.

सध्या तेच घडतंय का ?

काहीही असलं तरी कुणाला तरी विचार करायला हवा ना त्याचा. शहरं असोत वा गावं, हे संकट तर सगळ्यांवरच आलेलं आहे ना ? ह्याचं उत्तरही सगळ्यांनी एकजुटीनेच शोधायला हवं.

रमेश आणि हरखू ह्यांच्यात शून्यपणा दाटून आला. दोघेही एकमेकांकडे बघू लागले. जणू काही ते दोघेही एकमेकांची नव्याने ओळख पटवायला निघाले होते. कशी असते अशी अवस्था ? सगळं काही माहीत असूनही नवीन काही माहीत करून घ्यायची अवस्था ?

क्षणभरच्या मौनातही किती गोष्टी फेर धरून जातात. अशा प्रकारचं मौन खूप वेळपर्यंत सहनही होत नाही.

हरखू अजूनही भावनाशील मनाचाच आहे. त्याचं मन अजूनही भारावलेलं आहे. पण रमेश मात्र भावनाशील वृत्तीचा नाही. तो वास्तव जाणतो. ते लक्षात घेऊन काम करतो.

रमेशनेच मौनाचा भंग केला. "चला, उठा", तो म्हणाला. कॅमेरा उचलून, खुर्ची सरकावीत, रमेश दारापर्यंत आला.

हरखू अजूनही खुर्चीपाशी उभाच. "कुठं जायचं ?" त्याने विचारलं.

"आज रात्री एक सभा आहे. जवळच्याच गावात. तिथं जाऊ या. गावातल्या लोकांनी एकजूट केली आहे झाडाझुडुपांसाठी, मातीसाठी, पाण्यासाठी", रमेशने खुलासा केला.



हरखू शहारला. तो रमेश बरोबर चालू लागला.

"पण उद्या मला कामावर हजर व्हायला हवं," हरखू म्हणाला.

"पोहोचलो नाही तर भलतंच काही उभं राहायचं."

रमेश हसला.

"हरखू तुला कळायचं नाही. अरे, मलाही नोकरी आहे. शिवाय शिक्षण चालू आहे म्हणून अभ्यासही आहेच. तरी एवढं मात्र मला पटलंय की सभेला जायलाच हवं. रात्रही तिथंच काढायला हवी."

रमेशच्या आवाजाला धार चढली.

हरखू शहारला. रमेशबरोबर निघाला.

थाळ्यांचा नाद घुमला. चारी दिशा झंकारल्या. थाळ्यांचा नाद म्हणजे जागरणाची सूचना. गावातली माणसं घराबाहेर पडली. चावडीवर पोहोचू लागली. एक, दोन, पाच असं करीत शेकडो माणसं जमलीत.

सूर्य बुडायला आला होता. उजेड फिका पडायला लागला. घरांच्या कोनाड्यांमधे, भिंतींवर दिवे लावले गेले. प्रत्येक घरावर दोन दिवे. काळोखाकडून उजेडाकडे. प्रकाशाचं प्रतीक. बघताबघता मशाल घेऊन एकजण येऊन ठेपला. पेटलेली मशाल.

"घेऊन मशाली हाती, हे गावकरी जन निघती
काळोख राहिला मागे, नवप्रकाश आहे पुढती"

गावफेरी निघाली. घोषणांनी सारा आसमंत दुमदुमला.

"सुन्या धरणीची हाक ऐका
हिरवी झाडं लावून टाका"

फेरी संपली. लोक मैदानात येऊन बसू लागले. महिला, मुले, मुली, वृद्ध, तरुण सारेच येऊन जमले. सभा जमून आली.

आज गावाचा वार्षिक उत्सव आहे. उत्सव तरी कोणता? भेगा पडलेल्या धरतीला हिरवा शिणगार करायचा. किती आगळी गोष्ट ही. कसं आहे हे गाव?


शहराला जोडलेलं एक लहानसं खेडं. शहराशी जवळचं नातं असलेलं. शहर आणि गावकऱ्यांनी मिळून घेतलेली ही सभा.

सभा सुरू झाली. गावकऱ्यांची भाषणं. टाळ्यांचा कडकडाट झाला. चांगल्या, आकर्षक घोषणा झाल्या. कुणाबद्दलही तक्रार नाही. कुणालाही दोष दिला गेला नाही. तासभर सभा चालली. सगळ्यांच्या तोंडी एकच गोष्ट. "झाडं लावा, झाडं जगवा. रोपं लावा, गवत वाढवा." एकेक जण सांगत होता. सगळे नीट ऐकत होते.

आपली पृथ्वी म्हणजे देणगी आहे. वाडवडिलांकडून मिळालेली देणगी. हिच्या कुशीत काय नाही बरं? पण कुणाही एकट्यासाठी नाही काहीच. सगळ्यांसाठी आहे. माणसं, पशू, पक्षी, कीटक, वृक्ष, सूर्य, वायू - ह्या सगळ्यांवर सगळ्यांचा समान हक्क आहे. सगळं सगळ्यांसाठी.

एक तरुण म्हणाला—

"मित्रहो, गावाची एकजूट झाल्यावर काय होऊ शकत नाही? ह्या गावाने हेच दाखवून दिलं आहे. एकीने, चांगल्या मार्गानेच आपण पुढे जाऊ शकतो. आपल्या कल्याणाचा विचार करू शकतो. गावाच्या गरजा



हाती मशाल धरूनी निघाले लोक माझ्या गावचे !
आता काळोख दूर करतील लोक माझ्या गावचे !



गावाकडूनच कशा पद्धतीने भागवून घ्याव्यात, ह्याचा विचार करायला हवा. आपल्याला आपली पावलं मजबूत करायला हवीत. अजून पुष्कळ पुढे जायचं आहे. आपल्या तात्पुरत्या लोभापायी पुढच्या पिढीसाठी संकटांचं ताट वाढून ठेवायचं नाहीय. आपण येणाऱ्या पिढीचा विचार करायला हवा. ह्या गावातून इतर गावांपर्यंत प्रकाश पसरवायचा आहे. हा विचार मनात ठेवूनच पुढची वाटचाल करायची आहे.

सभा संपली. लोक निघू लागले, पुन्हा घोषणा दुमदुमल्या. सगळ्यांचे चेहेरे आनंदले.

पहाट झाली. माणसं घराबाहेर पडली. त्यांचा लोंढा एका दिशेने निघाला. गावची सामुहिक जमीन. गायरानाची जागा. गावाचं स्वत:चं रान, स्वत:चं कुरण.

काय चाललंय हे. सगळेजण झाडांना सूताचा धागा बांधत आहेत. झाडाबरोबर माणसाचा संबंध. अतूट धाग्यांमध्ये बांधला गेलेला संबंध.

आज नारळीपौर्णिमा. रक्षाबंधनाचा दिवस. फक्त बहिणींनीच तेवढी आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधायची असं कुठं आहे ? वृक्षांची राखण, त्यांचं संगोपन करण्यासाठी प्रत्येकजण त्यांच्या बुंध्याला कच्चे धागे बांधतो आहे राखीचे. धागे कच्चे असले तरी प्रेमाचं बंधन केवढं पक्कं असतं त्यातून आलेलं.

वृद्ध, तरुण, मुले, मुली सगळेच कामात गुंतले आहेत. सगळ्यांच्याच हातात पॉलिथिनच्या छोट्याछोट्या पिशव्या आहेत. त्या बाजूला ठेवून ते फूटभर खोल खणलेल्या चौकोनी खड्ड्यात माती भरीत आहेत. त्यातच भरलेल्या पिशव्या ठेवीत आहेत.

आणि आता ओल्या मातीने भरलेल्या ह्या पिशव्यांमध्ये बी रुजवणं चाललं आहे. कुठल्या जातीच्या झाडांच्या आहेत बरं ह्या बिया ? ह्या बिया कुठल्या घ्याव्यात हे कोण ठरवते असते ?

हीच ती रोपवाटिका. 'लोक रोपवाटिका'; इथं सगळेजण मिळून मेहनतीनं रोपं तयार करतात. चार वर्ष झालीत ह्या चळवळीला. आतापर्यंत तीन लाख रोपं तयार झाली आहेत.

कुठल्या प्रकारची रोपं ? जी मोठी होऊन वृक्ष बनतील, पक्ष्यांना आसरा देतील, वाटसरूंना सावली देतील, जनावरांना चारा देतील आणि माणसांचं पोट भरतील. ज्यापासून मोकळा श्वास घ्यायला शुद्ध हवा मिळते आणि घरच्या चुलीला सरपण मिळते. किती आणि केवढं देतात झाडं ? घेत मात्र काहीच नाहीत.

पोरासोरांचं हुंदडण चाललंय. हसतखेळत होतय् काम. सगळ्यांना सगळ्यांचा आधार. कामही एकच. सगळ्यांच काम.

हे गाव कसं बरं जागं झालं ? कुणी जागं केलं ह्या गावाला ? कशी आली ही जागृती ?

फार किरकोळ बाब घडली. गावाच्या मालकीच्या गायरानावर, कुरणावर कुणीतरी बेकायदेशीरपणे ताबा मिळवला. शेकडो बिघे जमीन. गावकऱ्यांना ही चुकीची गोष्ट बघवली नाही. सभा भरली. ते कृत्य करणाऱ्याला गावकरी भेटले. समजावून पाहिलं. पण त्याला ते पटलं नाही. मग लोकांनी एकजूट केली. शासनाच्या मोठ्या अधिकाऱ्याकडे ते गेले. सगळी हकीकत सांगितली. गावाची अडचण त्याच्यापुढे मांडली.

अधिकाऱ्याने अडचण ओळखली. ताबा काढून घेतला. गायरान कुरण पुन्हा मोकळं झालं. पण एवढ्यावरच सगळं थांबलं नाही.



सर्व जण झाडांना सूताचा धागा बांधत होते. वृक्षाबरोबर मानवाचं नातं !

आपण सावध राहिलो नाही तर अशाच प्रकारे ताबा काढून घेतला जाईल. सगळ्यांनी मिळून त्यांच्या गायरान कुरणाच्या विकासाचा निर्णय घेतला.

सर्वांनी मिळून प्रतिज्ञा केली, "वृक्ष पिता आहे, हिरवळ आपली माता आहे !"

तेथे होत असलेलं काम बघण्यासाठी लांबलांबहून माणसं यायला लागली. बघताबघता गायरान कुरणाच्या सभोवती हिरव्या वृक्षांची भिंत उभी राहिली. रोपं झपाट्याने लावली जाऊ लागली.

गायरानात गावकऱ्यांसाठी सार्वजनिक विहीर तयार झाली. तिला पाणीही भरपूर लागलं. गायरानाच्या पडिक जमिनीवर हिरवळ उगवली.





गुरं-वासरं टणाटणा उडया मारीत हुंदडत होती. गांव जसं काही नांदत, भरलं गोकुळ झालं.

गवत चरणाऱ्या गायी. त्यांच्या गळ्यात वाजणाऱ्या घंटा. हुंदडणारी वासरं. गावाचं गोकुळच झालं.

केलेल्या कामामुळं गावाचं नाव झालं. गावकऱ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव झाला. गाव उभं राहिलं.

कसं उदाहरण घडवून दिलंय् गावाने ! एक पाऊलही जावू न शकणाऱ्या झाडांसाठी, एक शब्दही बोलू न शकणाऱ्या पशुधनासाठी जनजागृती.

मग का बरं म्हणू नये लहान गावची महान गोष्ट ! उत्सव संपला. हरखू आणि रमेश शहराकडे निघाले.

हरखूला आता कामावर जायची कटकट वाटली नाही. चेहेऱ्यावर तेज झळकत होतं. पण विमनस्कपणा ओसरला नव्हता. अजूनही तो बेचैनच होता.

रमेशही खुषीत होता. गावच्या जागरणाच्या उत्सवात आपला सहभाग दिल्याचा आनंद होता तो. गावकऱ्यांच्या मनात स्वतःचं एक स्थान निर्माण करण्याचा आनंद !

प्रत्येक कामात जणू रमेश डोकावत होता. परस्परांत एकरूप होऊन काम केल्यावर असंच घडतं. रमेशचं हे असं रूप हरखू पहिल्यांदाच बघत होता.

"काय कमाल आहे तुझी, रमेश" हरखू म्हणाला.

"ह्या गावाला तू नेहमी जात येत राहिलास आणि त्याबद्दल चकार शब्दही बोलला नाहीस कधी. ते लोक किती चाहतात तुला. तू दिसल्यावर केवढा आनंद होतो त्यांना !"

रमेशनं हटकलं नसतं तर हरखू कदाचित बोलतच सुटला असता.

रमेश म्हणाला—

"अरे, हरखू — कसा रे तू इतका भावनाशील ? अरे, तू म्हणतोस, तसं काही नसतं रे बाबा. गावाकडची माणसं असतात अशी साधीभोळी. त्यांच्यात थोडीशीही आपण ऊठबस केली की आपल्याला डोक्यावरच घेतात अगदी. तुझंच बघ ना आता, तू सुद्धा गावाकडचाच तर आहेस. केवढा मान देतोस मला."

"पुरे, पुरे आता रमेश. खरं तर तूच वाट दावलीस त्या गावाला" हरखू म्हणाला.


"नाही रे, बाबा. मी तर पुष्कळच उशीरा आलो. खरी शक्ती ह्या गावातच दडलेली आहे. तेच आपण होऊन उभे राहिले आधी. असं काय कुणी बाहेरचं माणूस येऊन कुणाला उभं केलं असतं काय ? आपण जागे होतो तेव्हां खरी आपली पहाट असते. समजलं का, हरखू ?

"हो, समजलं बाबा. पण तुझ्यामुळे त्यांची ताकद वाढली आहे, हे खरंय् की नाही ? नाहीतर एवढा मोठा उत्सव ह्या गावाला पेलवला नसता. बरीच मोठमोठाली माणसं होती त्यात."

हरखूला मध्येच अडवीत रमेश म्हणाला—

"गावाची कुवत किरकोळ समजू नकोस तू. त्यांची शक्ती खरोखरच जागी व्हायला हवी. एकदा जागी झाली की मग मात्र बघायला नको. मग सगळं काही आपोआप घडून येतं आणि मोठ्या माणसांचं सोड रे, तशीच वेळ आली की सगळे निघून जातात. मुद्याची गोष्ट ध्यानात घे. हाक मारल्यावर कोण समोर येतं, त्याच्यामुळे वाढते आपली ताकद."

"तेच तर मी सांगतोय. पण तुझ्या लक्षात येत नाहीये. बरं, असू दे. पण तुला ओळखणाऱ्या कुणालाही तिथं तुझा प्रभाव नक्कीच जाणवणार," हरखू म्हणाला.



रमेश म्हणाला, "अरे हरखू तू सुध्दा अगदी असा आहेस – अगदी हळवा, विशेष काही झालं नाही रे." खेडयातील माणसं अशीच सरळ, साधीभोळी असतात."

"बरं, मान्य केलं तू काय म्हणतोस ते," असं म्हणत रमेश हसला.

दोघेही पुन्हा गप्प झाले. थोड्या वेळातच बस थांब्यावर पोहोचली. गाडी थांबली. दोघेही उतरले.

रमेशने हरखूकडे पाहिलं.

"चल, तुझ्या खोलीवर येतो," हरखू म्हणाला. दोघेही पुढे निघाले.

"पण काय रे, कामावर नाही जायचं? काल तर म्हणत होतास की अडचणीचं होईल म्हणून – "रमेश म्हणाला."

"ते असू दे रे. होईल ते होईल. मला तुझ्याशी पुष्कळ बोलायचं आहे. काही वेगळंच करायचं म्हणतोय् मी." हरखू म्हणाला.

दोघेही चालत राहिले.

"काय माणूस आहेस रे तू, हरखू? तुझं काहीच कळत नाही आपल्याला. काल काही निराळंच म्हणत होतास, वाटेत काही वेगळंच म्हणालास आणि आता तर कामावरही जात नाहीस. तूच विचार कर बरं, अशाने कसं व्हायचं?" रमेश खांद्यावर हात ठेवीत म्हणाला.

हरखूचं मन आता घट्ट झालं होतं, तो थांबला नाही. दोघेही चालत राहिले. त्याने रमेशकडे पाहून म्हटलं–

"मीही तोच विचार करतो आहे. तुझ्याशीही तेच मला बोलायचं आहे. आता काय आणि कसं केलं पाहिजे आपण, मी माझं ठरवलं आहे. तू तुझा सल्ला फक्त दे. बस, हेच बोलायचं आहे."

एवढ्या गर्दीच्या रस्त्यावर ते वेगळेच लक्षात येत होते. खांद्याला पिशवी लटकवलेली, अंगावर जाड्याभरड्या कापडाचा सदरा आणि

पायजमा, पायात गावठी वाहणा, चालण्यात एक प्रकारची जिद्द, आत्मविश्वास.

बस थांब्यापासून रमेशची खोली थोडी दूर होती. अर्ध्या तासात दोघेही तेथे पोहोचले.

हरखू बाजेवर अर्धवट पसरला. रमेश खुर्चीवर बसला. बूट काढले. खुर्चीवर पाय वर येऊन बसला. डोळे मिटलेले. दोघेही दमलेले.

थोडा वेळ गेला. दोघेही गप्पच.

हरखू आता नीट बसला. म्हणाला—

"रमेश, खूप दमला आहेस तू."

"तसं काही नाही रे. मला तर तूच दमलेला दिसतो आहेस. म्हणून मी गप्प बसलो होतो. बोल आता, काय विचार आहे तुझा? काय बोलायचंय तुला?" रमेशने विचारलं.

"हो रमेश, नोकरी सोडून द्यावी असं वाटतय मला. माझ्या गावी परत जावं, तिथंच राहावं. काम करावं; काल मी पाहिलं आहे तसंच काम करायचं म्हणतोय. घरची जमीन आहे. मेहनत केल्यावर काय होत नाही? ते मी करीन गावात. इतरही जण करतील. नोकरीत काय ठेवलंय्? ती कुठं कायमची आहे?" हरखू म्हणाला.

रमेश विचारात पडला – काय म्हणतोय् हा हरखू? झालं काय ह्याला एकदम? काही कळत नाही बुवा.

दोघेही गप्प. एकमेकांकडे बघत.

"बोल", हरखू म्हणाला.

"तू जे सांगतो आहेस ते अगदी खरं आहे रे. अगदी योग्य विचार आहे तुझा. सध्याच्या परिस्थितीत ह्याची गरज आहे. पण हरखू, तुझी ही परिस्थिती तू नीटनीट ओळखून काय करायचं ते कर. काकांना तू एकटाच आधार आहेस. किती अडचणी सोसूनही त्यांनी तुझं बी.ए. पर्यंतचं शिक्षण दिलं. जरा त्यांच्या आशेचाही विचार तू करायला हवास." रमेशने जाणीव करून देत म्हटलं.

हरखू म्हणाला–"हो, बी.ए. झालो म्हणून काय झालं? शेवटी आहे मात्र मजूरच ना? तोही पुरेसं कौशल्य नसलेला. कधी तरी काकांच्याही लक्षात येईलच हे सारं. आताही आईचा हट्ट चाललाय लग्नासाठी. म्हणतेय् –

"मी म्हातारी झालेय् पोरा. मला आता आधार हवा आहे. तुझ्याबरोबर सुनेला शहरात घेऊन गेलास तर तुलाही पोटापाण्याचा आधार होईल."

हरखूनं त्याचं म्हणणं स्पष्टपणे मांडलं. त्यानं आता पक्कं ठरवलंय की गावालाच परत जायचं. तिथंच राहायचं. रमेशला मनोमन आनंद होत होता.

रमेश म्हणाला, "म्हणजे तू पक्कंच ठरवलं म्हणायचं गावी जायचं. अजूनही नीट विचार कर. मला पसंत आहे, तू योग्य तोच निर्णय घेतला आहेस."

"आता आणखी काय नीट ठरवायचं रे, रमेश ! तुझं मत तेवढं घ्यायचं होतं. तू सांग, तू येत राहाशील ना गावी ?" हरखूने विचारलं.

“घ्या, आता हे काय आणखी ? अरे, मी तर येतच राहीन. मिळून काम करू. एकामुळे दुसरा, दुसऱ्यामुळे तिसरा अशा पद्धतीने पुढे जाऊ. सुट्ट्यांमध्ये किंवा जेव्हा जेव्हा तू म्हणशील तेव्हा मी येत राहीन. बोलताबोलता रमेश क्षणभर थांबला.

पुन्हा सांगू लागला–

“आज हेच व्हायला हवंय, हरखू. गावाला आपली गरज आहे. आपण गेल्यामुळे त्यांचाही जोम वाढेल. काम करायच्या नव्यानव्या पद्धती समजतील. गावाला टिकवून धरणाऱ्या, गावाला वाचवणाऱ्या नवीन पद्धती समजतील.


रमेश आता बोलतच सुटला होता. गावी जायचा निश्चय सांगून हरखूने त्याचं बळच वाढवलं होतं.

तो पुन्हा सांगू लागला–

“आता पहा बरं, हरखू, गावोगावी उजेड येणं ही काही कठीण गोष्ट नाहीये. प्रत्येक गावात गोधन, पशुधन आहे. प्रत्येक गावात कुरणं, गायरानं आहेत. गोबर गॅसमुळे उजेड मिळू शकतो. विहीर असेल तर तिच्यावरचा पंपही चालू शकतो आणि शेणाचं काय रे, ते तर गायीपासून सहजच मिळू शकतं. दुष्काळावरही मात करता येईल. कुरण, गायरानांमधल्या पडिक जमिनीवर हिरवळ फुलवता येऊ शकते.

हरखू प्रत्येक गोष्ट मन लावून ऐकत होता. रमेश बोलायचा थांबल्यावर तो म्हणाला,

“तुझं बरोबर आहे रमेश. प्रत्येक गावात कुरण गायरान हे असतंच असतं. नसलं तर पंचायतीकडून त्याची व्यवस्था करून घेता येईल. आपल्या गावात आहे बुवा गायरान. त्यावरही मेहनत घेता येईल. काका,



खेडोपाडी गुराखी आहेत, गाईंना चरण्यासाठी कुरणं आहेत.
गोबर गॅसमुळे प्रकाश मिळू शकेल.

रामूदादा, गंगूमामा ही माणसं आता म्हातारी झालीत. म्हणून काय झालं. त्यांना गायरानावर घेऊन जाता येईल. थोडंसं काम पुढे गेलं की त्या सर्वांना तिथंच वेळ घालवता येईल.

हरखू जरा गप्प झाला होता. तो पुन्हा सांगू लागला "आणखीही एक गोष्ट होऊ शकते. गावात आठवीपर्यंत शाळा आहे. शाळेत शिकणारी गावातलीच मुलं आहेत. त्यांनाही फावल्या वेळात तिथं घेऊन जाता येईल. आपणसुद्धा एक रोपवाटिका तयार करू शकतो. "जन रोपवाटिका." त्याठिकाणी गावाला उपयुक्त ठरणारी रोपं वाढवली जातील. गावातल्या पशुधनासाठी चारा भरपूर मिळू शकेल, अशीच झाडंही वाढवायला हवीत. खरंतर पृथ्वीवर अशा तऱ्हेची किती तरी झाडं आहेत. त्यातलीच निवडायला हवीत.

हरखूला आता पुरेपूर जोम चढला होता. गावी जाण्यासाठी तो अगदी उतावीळ झाला होता.

रमेश पुन्हा विचार करू लागला. त्याला वाटलं की हरखू भावनेच्या भरात वाहात चाललाय त्याला थोडं आवरायला हवं. कारण असं व्हायला नको. मनचे मांडे खाऊ द्यायला नकोत.

"हो- - हो- - सगळं काही होऊ शकेल. पण एकाच वेळी नाही. एकापाठोपाठ एकेक करून. तू नोकरी सोडून जाणार आहेस का? गेल्याबरोबर दुसरं काम धरायला हवं. असं केलं नाहीस तर काकांच्या मनाला काय वाटेल बरं? आणि गुजराण कशी व्हायची?" रमेश त्याला सावध करीत म्हणाला.

हरखू जरा गांगरला, म्हणाला, "अरे हो, हे तू बरोबरच म्हणतो आहेस. ते करायलाच हवंय. नाहीतर माझी टवाळी होईल. रामूदादाने काळूला



शाळेत शिकणारी मुलं खेड्यातलीच तर आहेत.
त्यांना वेळ असेल तेव्हा तेथे नेता येते.

न्यायला सांगितलं होतं. मी आणलं नाही. मला गावी परतलेलं पाहूनही असंच म्हणतील - स्वतःचाच ठावठिकाणा नाही तर काळूला नेऊन काय केलं असतं? तुझं म्हणणं बरोबर आहे, रमेश. आता तूच सांग. तिथं गेल्यागेल्या काय करू?"

हरखू गप्प झाला.

दोघांमध्ये पुन्हा शांतता पसरती. हरखू रमेशकडे पाहू लागला. काय सांगावं? हरखू तर जाणून घेण्यासाठी उतावीळच झाला होता.

रमेश विचार करीत राहिला. डोळे मिटून.

हरखू टक लावून त्याच्याकडे पहात होता.

रमेश आता नीट असा खुर्चीवर बसला.


डोळे उघडीत म्हणाला–"एक सांग, गावात आपलं शेत आहे ते गहाण ठेवलेलं आहे ना?"

"होय, रमेश. काकांच्या नावे कर्ज होतं. गेल्या वर्षीपासून माझं नावही त्यात घातलंय. जमीनही बरी आहे. पाऊस झाला तर पीक चांगलं येऊ शकतं. तुला काय करावंसं वाटतंय तिथं?" हरखूने विचारलं.

रमेश म्हणाला – "मला वाटतं शेतात विहीर खणावी. मोटार पंप बसवावा. मोटार पंपासाठी वीज, गोबर गॅसपासून तयार करावी."

"हे तू चांगलं सांगितलंस, रमेश. पण हे व्हायचं कसं? पैसा कोठून येणार? विहीर होणार कशी? गोबर गॅससाठीही विहीरच खणावी लागते का रे?" हरखूने प्रश्न काढले.

तू शेताचे कागद मागवून घे बरं, हरखू. इथं मी आहे तुझ्या मदतीला. ह्या कामांसाठी पैसा मिळू शकतो. बँकेकडूनही पैसा घेता येतो. एक योजना तयार करून द्यायला हवी. ह्या पडिक जमिनीत हिरवळ उगवण्यासाठीही



मी विचार करतोय, शेतामध्ये विहीर असावी. मोटर-बसवावा. मोटर पंपासाठी गोबर गॅसपासून वीज निर्माण करावी.



कित्येक ठिकाणून मदत मिळू शकते आणि आपण तर संपूर्ण गावासाठी योजना आखतोय् ही."

रमेशचं म्हणणं हरखूला पटत होतं. काम होणार अशी त्याचीही खात्री पटू लागली.

त्या गावात तर हे सगळं होतांना पाहिलं होतं खरं म्हणजे.

हरखू म्हणाला – "ठीक आहे, रमेश. मी उद्याच सोडतो नोकरी. आपलं हेच करायचं पक्कं ठरलं."

"सगळ्यांना जागं करायचं असेल तर आधी स्वत:लाच जागं केलं पाहिजे."

Printed at M/S Bharat Mudranalaya, Delhi



रु.10.00

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया